IIP: WJHSS | IIP World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# बाबूराव पेंटर : तंत्रज्ञानावर प्रभूत्व असणारे द्रष्टे चित्रपट दिग्दर्शक व निर्माते

**प्रियांका राजाराम पाटील**

संशोधक विद्यार्थी

इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*भारतीय चित्रपटसृष्टी, चित्रपट निर्मिती तंत्राचा चिकित्सक अभ्यास, मराठी चित्रपट*

**ABSTRACT**

कुस्ती पंढरी म्हणून जशी कोल्हापूरची ओळख आहे, तशीच चित्रपट पंढरी म्हणूनही कोल्हापूर परिचित आहे. भारतीय चित्रपटसृष्टीच्या वाटचालीत कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीने मोलाचे योगदान दिले आहे. यामध्ये प्रतिभावंत, द्रष्टे दिग्दर्शक बाबूराव पेंटर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. सैरंध्री, सिंहगड, सावकारी पाश, उषा, प्रतिभा, सीता स्वयंवर, दामाजी, कृष्ण अवतार, कल्याण खजिना, सती पद्मिनी, गजगौरी हे चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीत मैलाचे दगड ठरले आहेत. चित्रपट निर्मिती तंत्राचा चिकित्सक अभ्यास, चित्रपटांना दिलेली कलात्मक जोड आणि विविध अभिनव संकल्पनांचा केलेला वापर यातून बाबूराव पेंटर यांची तंत्रज्ञानावरील पकड स्पष्ट होते. दिग्दर्शन आणि निर्मितीतील गुणवत्तेने मराठी चित्रपट सृष्टीला त्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकीक मिळवून दिला.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Patil, P. R. (2025). बाबूराव पेंटर : तंत्रज्ञानावर प्रभूत्व असणारे द्रष्टे चित्रपट दिग्दर्शक व निर्माते. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2122–2126.

**प्रस्तावना –**

बाबूराव पेंटर यांचा जन्म ३ जून १८८९ रोजी कोल्हापूर येथे झाला. सुतारकाम हा त्यांच्या कुटुंबाचा व्यवसाय होता. बाबूराव कृष्णराव मेस्त्री हे त्यांचे मूळ नाव. मात्र, पडदे आणि सीनसीनरी रंगवण्याचे काम ते व त्यांचे आते भाऊ आनंदराव करत असत. त्यामुळे त्यांनी पेंटर हे आडनाव लावण्यास सुरवात केली. आनंदराव आणि बाबूराव यांनी काहीकाळ पोट्रेट करण्याचे काम केले. मात्र, त्यांना केशवराव भोसले यांच्या कंपनीचे पडदे व सीनसीनरी रंगविण्याचे काम करण्याची इच्छा होती. ती बोलून दाखविल्यावर केशवराव भोसले यांनी सुरवातीला आढेवेढे घेतले. मात्र, केशवरावांनी मुंबई मुक्कामी असताना १९०९-१० मध्ये त्यांना मुंबईला येण्यास सांगितले. बाबूरावही वडिलांबरोबर मुंबईला गेले. तेथे त्यांनी फोटोग्राफीचा स्टुडिओ सुरू केला. मुंबईत असताना आनंदराव व बाबूराव मूकपट पाहण्यासाठी जात. १९१३ च्या एप्रिल महिन्यात भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी तयार केलेला 'राजा हरिश्चंद्र' हा देशातील पहिला देशी मूकपट-चित्रपट पाहिला. मात्र, तो पाहिल्यावर ते निराश झाले. यावेळी त्यांच्या मनात स्वतःच चित्रपट तयार करण्याच्या इच्छेचे बीजारोपण झाले. [१]

**दादासाहेब फाळके यांचा नकार आणि देशी बनावटीचा कॅमेरा तयार**

मुंबईत स्टुडिओ असल्याने आनंदराव आणि बाबूराव फोटोग्राफी करत होते. त्यामुळे कॅमेऱ्याबाबत त्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली. ते कॅमेरा पाहण्यासाठी नाशिकला दादासाहेब फाळके यांच्याकडे गेले. त्यांनी फाळके यांना कॅमेरा दाखवण्याची विनंती केली. मात्र, त्यांनी नकार दिला. यातूनच कॅमेरा स्वतः तयार करण्याचा विचार पक्का झाला. ते केवळ विचार करून थांबले नाहीत. त्यांनी मुंबईला आल्यावर केशवराव भोसले यांच्या नवीन नाटकासाठी केलेल्या कामातून मिळालेल्या पैशातून जुन्या बाजारातून एक प्रोजेक्टर खरेदी केला. ते कोल्हापूरला परत आले. मुंबईहून आणलेला प्रोजेक्टर बाबूरावांनी सुटा करून पाहिला. यंत्रे, चक्रे व फिल्म पुढे कशी सरकते, त्याची गती यांचा अभ्यास केला. त्यानंतर तो प्रोजेक्टर बाबूरावांनी पुन्हा जोडला. याबाबतचे कोणतेही तंत्रशिक्षण त्यांनी घेतले नव्हते. कॅमेऱ्याचे तंत्रज्ञान वाचून समजून घेण्यासाठी इंग्रजी भाषेचे ज्ञानही नव्हते. पण, बाबूरावांकडे चिकित्सक वृत्ती आणि यंत्रकौशल्य होते. त्याच्या जोरावर त्यांनी चक्रे तयार करून घेतली. हॅंडेलही तयार केले. यातून हॅंडक्रॅंक कॅमेऱ्याची निर्मिती केली. त्याला परदेशातून मागवण्यात आलेले लेन्स बसवले. [२]

चारवर्षांच्या प्रयत्नानंतर हा नवा व देशी बनावटीचा कॅमेरा तयार झाला. हा कॅमेरा लाकडी पेटीसारखा दिसत असे. इतर देशी कॅमेऱ्यात नसलेली डायरेक्ट फोकसची अत्याधुनिक यंत्रणा बाबूराव पेंटर यांनी या कॅमेऱ्यात बसवली होती. कॅमेरा स्वतः तयार करण्याचा विचार सत्यात उतरवला. मात्र, पाहण्याचे भाग्य आनंदरावांना मिळाले नाही. त्यापूर्वीच त्यांचे निधन झाले होते. [३]

**महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना**

१ डिसेंबर १९१७ मध्ये सकाळी कोल्हापूरच्या पॅलेस थिएटरमध्ये बाबूरावांनी आनंदरावांच्या फोटोला हार घालून अभिवादन केले आणि 'आज मी 'महाराष्ट्र फिल्म कंपनी'ची स्थापना केली' एवढेच वाक्य उच्चारून चित्रपट निर्मिती संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. कंपनीतर्फे पहिला मूकपट सैरंध्री करण्याचे ठरवण्यात आले. बाबूराव चित्रकारही होते. त्यांनी सर्व पात्रांची चित्रे रेखाटून त्याप्रमाणे कलाकारांचा शोध सुरू केला. तेव्हा स्त्री भूमिकेसाठी स्त्री कलाकार म्हणून काम करण्यास महिला मिळणे अशक्य होते. पण, बाबूरावांनी प्रयत्न सोडले नाहीत. अखेर दिवसा काम करण्याच्या अटीवर सैरंध्रीची भूमिका करण्यासाठी गुलाबबाई आणि सुदेष्णा राणीची भूमिका साकारण्यासाठी अनुसयाबाई तयार झाल्या. [४]

**राळ, स्पिरीटपासून तयार केला गम**

सैरंध्री मूकपटातील पुरुष पात्र साकारणाऱ्या कलाकारांसाठी बकऱ्याच्या लोकरापासून दाढी-मिशा तयार केली. मात्र, ती चिकटवायची कशी असा प्रश्न उभा राहिल्यावर बाबूराव पेंटर यांनी राळ आणि स्पिरीटपासून गम तयार केला. शेला बांधण्याची पद्धत बाबूरावांनी याच चित्रपटासाठी प्रथम विकसित केली. आजही याच पद्धतीचा वापर केला जातो. [५]

**चित्रपट निर्मितीत अभिनव तंत्रप्रयोग**

कॅमेरा तयार केलाच; पण प्रिंटिंग मशिनही तयार केली. फिल्मचे प्रिंटिंग, फिल्म धुणे, फिल्म वाळवणे या प्रक्रियेसाठी लागणारी रसायनेही बाबूराव पेंटर सहकाऱ्यांच्या मदतीनेच करत होते. रिफ्लेक्टर्सचा शोधही बाबूराव पेंटर यांनीच लावला. शूटिंग दिवसा होत असल्याने पात्रांच्या चेहऱ्यावर हवा तेवढा प्रकाश मिळवण्यासाठी त्यांनी रिफ्लेक्टर्स तयार केले. एका गृहस्थाने विक्रीसाठी काढलेले ४० हॉर्सपॉवर असलेले इंजिन डायना व वायरिंगसह स्वतःच विकत घेतले. ते विष्णू दामले यांनी खोलले, पुन्हा जोडले. त्याचे नव्याने वायरिंगचे काम केले. त्याच्या विजेच्या आधारावर फोटोग्राफीचे चित्रण पूर्वीपेक्षा अधिक चांगले होऊ लागले. बाबूराव पेंटर आणि दामले यांच्या तंत्रकौशल्यातून हे यश मिळाले. 'किचकवध'साठी मदिरागृहाचा सेट उभारताना मोठे मदिरापात्र दाखवले. इतर मदिरापात्रे केवळ कटआउटमधून ब्रशच्या करामतीमधून साकारली. चित्रपटाचे एडिटिंगही बाबूरावांनी स्वतःच उत्तमरितीने केले. [६]

'मिडनाईट गर्ल'साठी बाबूराव पेंटर यांनी पॅनक्रोमॅटिक फिल्मचा वापर केला. शंकरराव किर्लोस्करांच्या किर्लोस्कर कारखान्यावर केलेल्या पहिल्या माहितीपटाचे चित्रीकरण 'इलेक्ट्रिक लाईट'वर केले होते. कलाकारांचे चेहरे नाजूक दिसण्यासाठी 'गॉज'चा वापर केला. महारथी कर्ण चित्रपटासाठी राजाराम तलावाजवळ कुरूक्षेत्राचा सेट उभा करून यद्धभूमीचे भव्य दर्शन घडवले होते. [७]

**'ट्रीकसीन'मध्ये हातखंडा**

बाबूराव पेंटर यांचा हातखंडा होता. कीचकवधाच्या प्रसंगातून बाबूरावांच्या 'ट्रीकसीन'मधील कौशल्याची प्रचिती येते. कंपनीच्या 'वत्सलाहरण ऊर्फ मायाबाजार' या चित्रपटाही 'ट्रीकसीन' होते. त्यासाठी ७००० रूपयांचा 'बेल अॅण्ड हॉवेल कंपनीच्या परदेशी कॅमेऱ्याची मागणी नोंदवली. तो मुंबईहून आल्यावर बाबूरावांनी तो सुटा केला. त्यातील प्रत्येक भागाचे काम कसे चालते याचा अभ्यास केल्यावर तो पुन्हा जोडला. या कॅमेऱ्यामुळे बाबूरावांना 'ट्रीकसीन' घेणे आणखी सुलभ झाले. पुढे शांताराम भावे यांनी गुरू बाबूराव पेंटर यांच्या मार्गदर्शनाखाली 'ट्रीकसीन' मास्टर झाले. या चित्रपटासाठी मुंबईत चित्रपटगृहावर ५० फूट उंचीचे घटोत्कचचे कटआऊट उभारले होते, ज्याची मोठी चर्चा झाली. इतर रंगीत पोस्टर्सची पुणे येथील चित्रशाळेत छपाई केली. चित्रकार असणाऱ्या बाबूरावांनीच तेथील कलाकारांना रंगसंगतीच्या सूचना केल्या. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली रंगीत पोस्टर्स तयार होऊन सर्वत्र लागली. यातील ट्रीकसीन प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. [८]

**स्टुडिओबाहेर प्रथमच चित्रीकरण**

सिंहगड चित्रपटासाठी बाबूराव पेंटर यांनी प्रथमच चित्रीकरण स्टुडिओबाहेर चित्रीकरण केले. त्याच्या मशिनरी पन्हाळागडावर बैलगाडीतून नेल्या. परिसरातील खेड्यांतून तगडे २५० लोक निवडले. त्यांच्याकडून लढाईचा प्रसंगी चित्रीत केला. यावेळी लाल रंगाच्या ज्वाला दिसण्यासाठी प्रोजेक्टरपुढे लाल जिलेटीनचे कागद धरले होते. त्यामुळे मशालीच्या प्रकाशात मावळे सिंहगड सर करताहेत असा आभास निर्माण करण्यात यश मिळाले. ही बाबूरावांच्या तंत्रकौशल्यची किमया होती. जागतिक प्रदर्शनात परीक्षकांनी ' This picture is an outstanding example of sincerity and direction' असा अभिप्राय नोंदवला होता. हा अभिप्राय म्हणजे बाबूराव पेंटर यांच्या चित्रपट प्रतिभेला जागतिक स्तरावर मिळालेली पोचपावतीच होती. [९]
विजेच्या प्रकाशात चित्रीकरण झालेला 'सिंहगड' हा पहिलाच भारतीय चित्रपट आहे. शिवाय स्टुडिओबाहेर चित्रीकरण झालेला पहिला चित्रपट म्हणूनही 'सिंहगड'ची नोंद आहे. या चित्रपटासाठी तयार केलेल्या भित्तीपत्रकामुळे चित्रपटांसाठी भित्तीपत्रके तयार करण्याचे श्रेयही बाबूराव पेंटर यांच्याकडेच जाते. [१०]
(मालाडकर, सागरः पेंटर बाबूराव)
https://www.marathisrushti.com/profiles/baburao-penter/

या चित्रपटाची पोस्टर्स पाहिल्यावर सर जे. जे स्कूल आॅफ आर्टचे तत्कालीन प्राचार्य ग्लॅडस्टन सॉलोमन बाबूरावांना म्हणाले, 'या चित्रांना मी अॅकॅडमीची पेंटिंग्ज समजतो. कृपा करून ती जपून ठेवा. अशी उन्हात लावून त्या चित्रांचा, तुमच्याव

आमच्या कलेचा अपमान करू नका' [११]

**फ्लॅशबॅक तंत्राचा प्रथमच वापर**

१९२५ मध्ये बाबूराव पेंटर यांनी शेतकऱ्यांची पिळवणूक करणारा सावकार चित्रीत करणाऱ्या 'सावकारी पाश' या चित्रपटाची निर्मिती केली. याच चित्रपटाने त्यांना वास्ववादी चित्रपट काढणारे पहिले-निर्माता दिग्दर्शक अशी ओळख मिळवून दिली. आज चित्रपटात दिसणाऱ्या फ्लॅशबॅक तंत्राचा बाबूराव पेंटर यांनी याच चित्रपटात प्रथम वापर केला होता. यातून त्यांच्या द्रष्टेपणाची प्रचिती येते. हाच चित्रपट बाबूराव पेंटर यांनी शालिनी सिनेटोनतर्फे बोलपट म्हणून दिग्दर्शित केला. [१२]
'सावकारी पाश' या चित्रपटामुळे बाबूराव पेंटर यांची तुलना प्रख्यात अमेरिकन दिग्दर्शक डी. डब्ल्यू ग्रथिफ यांच्याशी झाली. बाबुराव पेंढारकर यांनी 'चित्र आणि चरित्र' या पुस्तकात बाबूरावांच्या मते चित्रपटाचा आत्मा कशात असतो ते नमूद केले आहे. बाबूराव पेंटर म्हणतात ' तुम्ही बोलपट तयार केला म्हणजे त्याची ट्रायल दोनवेळा पाहा. पहिली ट्रायल आवाज बंद करून म्हणजे आपण मूकपट पाहतो तशी व दुसरी ट्रायल चित्र न पाहता नुसता आवाज ऐकावयाचा अशी. दोन्ही प्रसंगी लहान मुलांना, स्त्रियांना जर तुमची गोष्ट समजली तर तुम्ही शंभर मार्क मिळवले, नाही तर नापास'. वरील विधानातून बाबूराव पेंटर यांचे चित्रपट तंत्रज्ञानाचे बहुआयामी आकलन व पकड स्पष्ट होते. [१३]

**शिष्यपरंपरा**

व्ही. शांताराम, विष्णूपंत दामले, फत्तेलाल, केशवराव धायबर, भालजी पेंढारकर, बाबूराव पेंढारकर, विनायक पेंढारकर या बाबूराव पेंटर ॲकॅडमीत तयार झालेल्या दिग्दर्शकांनी अनेक सर्वोत्तम चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीला दिले. एवढेच नव्हे तर दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक एच. ए. रेड्डी, पुलैया यांनी बाबूराव पेंटरांच्या हाताखाली काम करत दिग्दर्शनातील धडे गिरवले. चंद्रकांत मांडरे यांच्यासह अनेक कलाकारांनी आपल्या करिअरची सुरवात बाबूराव पेंटर यांच्या मार्गदर्शनाखालीच झालेली आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील एक पिढी त्यांच्या तालमीत तयार झाली आहे. [१४]

**निष्कर्ष**

बाबूराव पेंटर यांनी पहिल्या देशी बनावटीच्या कॅमेऱ्याची निर्मिती केली. १९१८ मधीस कॉंगेस अधिवेशनाची फिल्म पाहिल्यावर लोकमान्य टिळक यांनी बाबूराव पेंटर यांना बाबूराव पेंटर यांना 'सिनेमा केसरी' ही पदवी प्रदान केली. बाबुराव पेंटर यांचे चित्रपटसृष्टीतील कारकीर्द पाहता ती पदवी सार्थ होती, हे स्पष्ट होते. मराठीत एकापेक्षा एक सरस चित्रपट देणाऱ्या प्रभात फिल्म कंपनीची स्थापना केली. पुढे प्रभात कंपनी पुणे येथे स्थलांतरीत झाली तरी तीचा पाया बाबूराव पेंटर यांनीच घातला. फ्लॅशबॅक तंत्राचा वापर, स्टुडिओबाहेर प्रथमच चित्रीकरण, 'ट्रीकसीन', स्त्री पात्रांसाठी स्त्रियांचा प्रथमच केलेला समावेश, चित्रपटांसाठी भित्तीपत्रके , रिफ्लेकटर्स, भव्य सेट्स आणि कटआऊट यांचे जनकत्व बाबूराव पेंटर यांच्याकडेच जाते. सैरंध्री चित्रपटात 'ट्रीकसीन'च्या माध्यमातून चित्रीकरण केलेला कीचकवधाचा प्रसंग पाहून इंग्रज सरकारने भारतात सेन्सॉरशीपला सुरवात केली. बाबूराव पेंटर दिग्दर्शित केलेले चित्रपट आणि त्यातील आशय, तंत्रज्ञानाचा केलेला वापर व कलात्मक जोड पाहिल्यास मराठी चित्रपट सृष्टीतील द्रष्टे चित्रपट दिग्दर्शक व निर्माते म्हणून बाबूराव पेंटर यांचे नाव नोंदवले जाईल. १६ जानेवारी १९५४ रोजी बाबूराव पेंटर यांचे हृदयविकाराचा झटका येऊन निधन झाले. त्यांना ६४ वर्षांचेच आयुष्य लाभले. त्यांना पुढे काही वर्षे आयुष्य लाभले असते तर मराठी चित्रपट सृष्टीला आणखी सर्वोत्तम चित्रपट मिळाले असते आणि कलावंतही.

**संदर्भ**

१) नाडकर्णी, ज्ञानेश्वर (१९८९) ः चित्रपटांना कलेचे लेणे चढविणारा महर्षी बाबूराव पेंटर, चित्रसंपदा विशेषांक (१९८९) पृ.क्र. ५३)
२) तांबट, प्रभाकर(२०१७)ः इये कोल्हापूरचिये चित्रनगरी, सिन्नरकर, सतीश(संपा), महानगरी वार्ताहर विशेषांक (२०१७, पृ.

क्र. ३७)
३) उपरोक्त, नाडकर्णी ज्ञानेश्वर, १९८९, पृ. क्र. ५४
४) उपरोक्त, तांबट प्रभाकर, २०१७, पृ. क्र.३७
५) कित्ता, २०१७, पृ. क्र.३८
६) कित्ता, २०१७, पृ. क्र.३८
७) कित्ता, २०१७, पृ. क्र.४०
८) कित्ता, २०१७, पृ. क्र.३८
९) कित्ता, २०१७, पृ. क्र.३९
१०) मालाडकर, सागरः पेंटर बाबूराव https://www.marathisrushti.com/profiles/baburao-penter/
११) उपरोक्त, नाडकर्णी ज्ञानेश्वर, १९८९, पृ. क्र. ५५
१२) उपरोक्त, तांबट प्रभाकर, २०१७, पृ. क्र. ४०
१३) उपरोक्त, नाडकर्णी ज्ञानेश्वर, १९८९, पृ. क्र. ५५
१४) पाटील, दीपक ः कलामहर्षी बाबूराव पेंटर https://www.discovermh.com/baburao-painter/